जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता
बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत    संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सोमवार दि.२३ सप्टेंबर २०२४
किंमत २ रुपये | महाराष्ट्र
मराठी    दैनिक
वर्ष : ०२    अंक : २१
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com    Lokneta News - लोकनेता न्युज    8459977904    epaper.lokneta.in

# सत्ता संघर्षाच्या सुनावणीआधीच सरन्यायाधीश चंद्रचूड-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे एकाच मंचावर

## मुंबई हायकोर्टाच्या नवीन इमारतीच्या भूमिपूजनाचा कार्यक्रम

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

२३ सप्टेंबर रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या नवीन प्रस्तावीत इमारतीचे भूमिपूजन होणार आहे. या कार्यक्रमाला सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे एकाच मंचातर येणार आहेत. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस आमदार अपात्रता प्रकरणाची सुनावणीआधी सरन्यायाधी धनंजय चंद्रचूड, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार एकाच व्यासपीठावर येणार असल्याने राजकीय वातातरण तापण्याची शक्यता आहे.

२४ सप्टेंबर रोजी आमदार अपात्रता प्रकरणावर सुनावणी होणार आहे. त्यामुळे या सुनावणीकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. त्याच्या एक दिवस आधी मुंबईत हा कार्यक्रम होत असून सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे एकाच व्यासपीठावर येणार आहेत. यावेळी शिंदे यांच्यासह उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे देखील उपस्थित असणार आहेत. मुंबई उच्च न्यायालयाची छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस जवळची ऐतिहासिक इमारत जागावापरासाठी कमी पडत होती. त्यामुळे हायकोर्टाला नवीन इमारत देण्यात यावी, अशी मागणी केली जात होती. मुंबई उच्च न्यायालयाच्या नवीन जागेसाठी २०१९ पासून हायकोर्टाच्या बार असोसिएशनचा लढा सुरू होता. अखेर या लढ्याल यश आले असून २३ सप्टेंबर रोजी नवीन प्रस्तावित इमारतीचे उद्घाटन होणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नवीन इमारतीसाठी राज्य सरकारने गोरेगावचा पर्याय दिला होता. मात्र शेवटी बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स (बीकेसी) येथे ही इमारत उभारण्याचे निश्चित झाले आहे.

सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या हस्ते या इमारतीचे भूमिपूजन होणार आहे. याप्रसंगी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश बी. आर. गवई, न्या. ए. एक. ओका, न्या. दीपांकर दत्ता, न्या. उज्वल भूयान, न्या. प्रसन्न वरले, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश देवेंद्र कुमार उपाध्याय, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची उपस्थिती राहणार आहे.



### खा.अशोकराव चव्हाण यांचे विश्वासू

# मारोतराव कवळे गुरुजीं यांना लोक-सभेत पाठविण्याचा मतदारांचा निर्धार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | प्रतिनिधी**



नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीची तारीख लवकरच जाहीर होणार असून भारत निवडणूक आयोग मुंबई येथे पत्रकार परिषद घेऊन निवडणुकीच्या तारखा लवकरच जाहीर करणार असल्याचे समजते.त्यानुसंगाने नांदेड लोकसभा मतदारसंघातील मतदार राजा च्या भावना जाणून घेतल्यानंतर असे निदर्शनास आले आहे की शुन्यातून विश्व निर्माण करणारे आणि महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री विद्यमान खासदार अशोकराव चव्हाण साहेब यांचे विश्वासू मर्जीतील लोकनेते व्हिपीके उद्योग समुहाचे चेअरमन मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांच्या नावाची मतदार संघात चर्चा चालू आहे.मतदार राजा आपल्या देशांचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या पारड्यात नांदेड लोकसभेची जागा टाकणार असून उद्योगरत्न मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांना खासदार म्हणून निवडून देण्याचा निर्धार केला असल्याचे समजले आहे त्यानां खासदार केले तर नांदेड जिल्हात उद्योग धंदे वाढतील आणि आपल्या जिल्हातील बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध करून देतील.शेतीवर आधारित उद्योग उभारले गेले तर आपोआपच शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळेल असे ही मतदारांनी आपले विचार मांडले आहेत.फक्त मतदार संघात एकच चर्चा चालू आहे की खा.अशोकराव चव्हाण यांनी नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीत मारोतराव कवळे गुरूजी यांना उमेदवारी मिळवून द्यावी आम्ही गुरूजींना भाजपाचा खासदार म्हणून निवडून देण्याचा निर्धार केला असल्याचे बोलल्या जात आहे.

# श्रीगोंदा येथे कर्मवीर (आण्णां) भाऊराव पाटील यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा | ज्ञानेश्वर येवले**

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांनी बहुजनांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून केले. शिक्षण आणि श्रम यांची सांगड घालून सक्षम पिढी घडवण्याचा आदर्श त्यांनी निर्माण केला. विद्यार्थ्यांना कमवा आणि शिका हा मूलमंत्र देखील त्यांनी दिला त्यांच्या जयंती निमित्त २२/०९/२४ रोजी श्रीगोंदा येथील रयत शिक्षण संस्थेचे महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय, महादजी शिंदे विद्यालय व राजमाता कन्या विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीगोंदा शहरितुन भव्य मिरवणूक काढुन शालेय विद्यार्थी यांच्या



ढोल व ताशांच्या गजरात जयंती साजरी करण्यात आली.

सालाबादप्रमाणे या वर्षीही मिरवणूक रविवार पेठ येथे आल्यावर सदभावना आनंद सेवा मंडळ ट्रस्ट यांच्या वतीने कर्मवीर अण्णांच्या रथाचे स्वागत करुन सालाबादप्रमाणे यंदाही मुलांना पाणी व खाऊचे वाटप करण्यात आले.

# जिके सौर कंपनी कडून शेतकऱ्यांना उडवाउडवीची उत्तरे

## पाच महिने पैसे भरूनही अद्याप सौर पंप फिट केला नाही

### शेतकऱ्याची पिके पाण्याअभावी सुकायला लागली,जिके कंपनीवर कारवाईची मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा | प्रतिनिधी**

तालुक्यातील किनगाव राजा येथील शेतकऱ्यांनी शेतामध्ये सौर पंप स्थापित करण्यासाठी एप्रिल २०२४ मध्ये जिके एनर्जी मार्केटिंग प्रा लि कंपनी कडे २२९७१ रूपायांचा भरणा करूनही अद्याप सदर कंपनीने या शेतकऱ्यांच्या शेतावर सौर पंप बसविला नाही सदर कंपनी प्रतिनिधी कडे शेतकऱ्यांनी वारंवार संपर्क केला असता फक्त उडवाउडवीची उत्तरे मिळत असल्याने शेतकऱ्यांनी सदर कंपनीची तक्रार महा उर्जा कार्यालय अकोला यांच्याकडे केली असून या कंपनीवर कारवाई ची मागणी केली आहे याबाबत सविस्तर वृत्त असे की



किनगाव राजा येथील शेतकरी राजेंद्र विजयसिंह राजेजाधव यांच्या शेतातील कपाशी,सिताफळ,व सिडस कंपनीचे पलॉट ची लागवड केली आहे मात्र पावसाअभावी व विजेअभावी सदर पिके ही सुकत आहे जर या फळपीक व सिडस यांना तात्काळ पाणी दिले नाही तर मोठ्या प्रमाणात या शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होणार आहे सदर शेतकरी यांनी जिके एनर्जी कंपनी कडे १८ एप्रिल २०२४ रोजी सौर पंप स्थापित करण्यासाठी २२९७१ रूपयांचा भरणा करूनही सदर पाच महिने उलटले तरी कंपनीने अद्याप या शेतकऱ्यांच्या शेतावर सौर पंप बसविला नसल्याने या शेतकऱ्यांनी जिके एनर्जी कंपनीच्या प्रतिनिधींना वारंवार संपर्क केला असता तो प्रतिनिधी उडवाउडवीची उत्तरे देत असल्याने या शेतकऱ्यांनी जिके एनर्जी कंपनीच्या विरोधात महाउर्जा कडे तक्रार नोंदवली असून या कंपनीवर कारवाई करण्याची मागणी केली आहे तसेच सदर तक्रार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, देवेंद्र फडणवीस यांच्या कडे केली असून सदर कंपनीला काळया यादीत टाकण्याची मागणी केली आहे.

# सहकार्यांना वाऱ्यावर सोडणार नाही ; विधान-सभा निवडणूक लढणारच-चंद्रसेन पाटील

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार | धोंडीबा मुंडे**



वंचित बहुजन आघाडीच्या वतीने लोहा - कंधार विधानसभा निवडणूक २०२४ साठी उमेदवारी जाहीर करण्यात आली असून, उमेदवारी मिळाली नाही,तरीही मी श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांच्यावर नाराज नाही, ते कायम आदरस्थानी आहेत, मात्र मागील अनेक दिवसांपासून माझे सहकारी विधानसभा निवडणुकीसाठी रात्रंदिवस झटत आहेत, त्यांना वाऱ्यावर सोडणार नाही, उमेदवारी जाहीर झाल्यानंतर अनेक सहकार्यांचे फोन आले यामुळे लोहा विधानसभा निवडणूक मी पुर्ण ताकतीने लढणार आहे असे निवेदन माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रसेन पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिले आहे.

वंचीत बहुजन आघाडीची उमेदवार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर मला मतदारसंघातून माझ्या सहकार्यांचे मोठ्या प्रमाणात फोन आले, मी माझ्यावर प्रेम करणाऱ्या सर्व सहकार्यांना निरोप देऊ इच्छीतो की मी विधानसभा निवडणुक २०२४ साठी उमेदवार असणारच आहे, कुठल्याही परिस्थितीत मी निवडणूक लढवणारच याबाबत शंका नसावी, याबाबत पुढील रणनीती ठरवण्यासाठी लवकरच कार्यकर्ता मेळावा घेऊन दिशा ठरवली जाणार आहे .

विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक गावोगावी भेटीसाठी लवकरच नियोजन करण्यात येईल. जनमताचा आदर करुन सहकार्यांच्या आग्रहास्तव आपण निवडणूक रिंगणात असणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले आहे.

**झाडे लावा झाडे जगवा**



**चारोळी**

निसर्गाचा नजारा
डोळ्यात भरावा
सौंदर्य टीकवण्याचा संकल्प
प्रत्येक मनी धरावा.

रंजना सानप
मायणी (सातारा)

# पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३७ व्या जयंती निमित्त पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालय आढळगाव येथे भव्य मिरवणूक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा | ज्ञानेश्वर येवले**

येथील रयत शिक्षण संस्थेच्या विद्यालयात रयत शिक्षण संस्थेचे थोर संस्थापक डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३७ वी जयंती साजरी करण्यात आली.त्या निमित्तने सर्व विद्यार्थ्यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली .स्कूल कमिटी अध्यक्ष तसेच जनरल बॉडी सदस्य श्री.गांधी साहेब यांच्या शुभहस्ते व विद्यमान सरपंच श्री. उबाळे साहेब यांचे उपस्थितीत तसेच शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री.नवनाथ शिंदे सर्व सदस्य ग्रामस्थ मुख्याध्यापक श्री सुरेश साळुंखे पर्यवेक्षक श्री. गायकवाड विजय सर, कर्मवीर भाऊराव पाटलांच्या प्रतिमेचे पूजन करून



मिरवणुकीला सुरुवात झाली. ढोल ताशांच्या गजरामध्ये विद्यार्थ्यांनी या मिरवणुकीमध्ये सहभागी घेतला. कर्मवीर भाऊराव पाटील यांची प्रतिमा व सजावट या मिरवणुकीचे आकर्षण ठरले . विद्यार्थ्यांनीनी विविध प्रकारची वेशभूषा,लेझीम, पारंपारिक नृत्याच्या तालावर ठेका धरला या मिरवणुकी दरम्यान शाळेतील विद्यार्थी यांनी विविध देशभक्ती गीते नृत्य सादर केली ग्रामस्थांनीही पाहण्याचा आनंद घेतला .ग्रामस्थ महिला भगिनीं ही मोठ्या संख्येने उपस्थित होत्या याप्रसंगी आढळगाव ग्राम पंचायत समितीच्या वतीने उत्कृष्ट लेझिम पथक तयार केल्या बद्दल रयत बँक संचालक श्री दिलीप तुपे सर,श्री.,दरेकर सर श्री खाडे सर श्री बुरसे सर यांचा सत्कार करण्यात आला तसेच सर्व शिक्षक महिला शिक्षक भगिनी तसेच मुख्याध्यापक व पर्यवेक्षक याचा ही सन्मान केला विद्यार्थ्यांमध्ये अतिशय उत्साहाचे वातावरण दिसून आले.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष व महाविकास आघाडीच्या सहा विधानसभेच्या जागा बीड जिल्ह्यामध्ये निवडून आणणार-खा.सोनवणे







■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे

लोकसभा निवडणुकीत सर्व सामान्य जनतेने निवडणूक हातात घेऊन मला निवडून दिले आहे.या झालेल्या लोकसभा निवडणुकीत आष्टीतील आजी माजी आमदाराचा पराभव केलेला आहे.आष्टी विधानसभा मतदारसंघातील नेत्यांची मग्रुरी आपल्याला उतरवायची आहे. बीड जिल्ह्यातील ज्या नेत्यांनी पवार साहेबांना धोका दिला त्यांना जनतेने नाकारले आहे. दोन महिन्यानंतर राज्याच्या राजकारणातील चित्र बदलणार असल्याचे सांगून बीड जिल्ह्यातील सहाच्या सहा आमदार राष्ट्रवादी काँग्रेसचे निवडून येणार आहेत.त्यामुळे एकजुटीने कामाला लागा.आष्टी विधानसभा मतदारसंघात राज्यांचे लक्ष वेधले आहे. शरद पवार यांना मानणारां एक वर्ग आहे. त्यामुळं यावेळी आष्टी मतदार संघात आमदार होणार. सर्व जाती धर्माच्या लोकांनी मला मतदान केले आहे.शरद पवार साहेब आणि मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या आशीर्वादाने मी खासदार झालो.मतदारांना कुणी वेठीस धरू नये असा इशारा राष्ट्रवादीचे खासदार बजरंग सोनवणे यांनी आष्टी येथे बोलताना दिला.

आष्टी येथे आज राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेशचे उपाध्यक्ष तथा मराठवाडा प्रमुख ड.नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांनी विधी सेल च्या प्रदेश कार्यालय व वकील व्यवसायाच्या कार्यालयाचे उद्घाटन बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या हस्ते केले सदरील उद्घाटन प्रसंगी बीडचे माजी आमदार राजेंद्र जगताप,आष्टी येथील माजी आमदार साहेबराव दरेकर, पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष श्री मिसाळ,पक्षाच्या प्रदेश सरचिटणीस सुशीलाताई मोराळे, पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले की, आष्टी मतदार संघातील जनतेने लोकसभेला राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाला मताची लीड जरी नसली दिली तरी गेल्या लोकसभेच्या मानाने जवळजवळ चाळीस हजार मतदान कमी केले व सामान्य जनतेने या ठिकाणी प्रस्थापित युतीचे तीन आमदार असताना देखील येथे सामान्य मतदार व सामान्य कार्यकर्त्यांनी आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या पक्षाबरोबर उभे राहून ताकद निर्माण केली त्याबद्दल आष्टी मतदार संघातील जनतेचे आभार मानले बीड जिल्ह्यातील रेल्वे प्रश्न तसेच बीड जिल्ह्यातील केंद्र सरकारच्या संबंधित जे जे प्रश्न असतील ते प्रश्न देखील सोडवण्यासाठी ते कटिबद्ध आहेत असे त्यांनी नमूद केले तसेच या जिल्ह्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा फक्त एकच आमदार असून बाकी जिल्हा परिषद पंचायत समिती यांची पदे नसल्यामुळे बीड जिल्ह्यातील जनतेच्या खासदार म्हणून माझ्याकडे कामाच्या खूप अपेक्षा आहेत व त्या अपेक्षा सोडवण्यासाठी मी कटिबद्ध आहे असे प्रतिपादन केले पक्षामधून जे लोक घड्याळाचे नावावर निवडून आले व ज्यांनी शरदचंद्र पवार साहेब यांना धोका दिला अशा मंडळीला विधानसभेच्या २०२४ च्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे थारा असणार नाही उलट पक्षी या लोकांच्या गुंडगिरी,दादागिरी व दहशतीचा राजकारणाला या मतदारसंघातील जनता कंटाळली असून सदरील मायबाप जनता येत्या विधानसभेला त्यांना धडा शिकवल्या शिवाय राहणार नाही असे खासदार बजरंग सोनवणे यांनी सांगितले.

ड.नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांनी त्यांची भूमिका मांडताना असे प्रतिपादन केले की आष्टी मतदार संघामध्ये पायाभूत सुविधा नसून या मतदारसंघांमध्ये कुठलाही कारखाना नाही. कडा येथिल कारखाना महेश सहकारी साखर कारखाना होता तो देखील बंद पडलेला असून त्या ठिकाणी कामगारांची पैसे देखील कारखाना परत करू शकलेला नाही आष्टी मतदार संघात आजपर्यंत एमआयडीसी देखील प्रस्थापित नेत्यांनी आणलेली नाही तसेच पिण्याच्या पाण्याचा साधा प्रश्न देखील सोडू शकले नाही, रस्ते रोड पाणी , दर्जेदार काम न होता विशिष्ट लोकांच्या घरामध्ये हा पैसा गेला असून मतदारसंघांमध्ये ठराविक कार्यकर्ते यांच्याकडे प्रचंड पैसा जमा झालेला असून त्या जोरावर आष्टी मतदार संघात दहशतीचे राजकारण चालू आहे आष्टी मतदार संघामध्ये अनेक घोटाळे उदाहरणार्थ पाटोदा नगरपंचायत मधील बंधारा या प्रकरणांमध्ये उच्च न्यायालयाच्या आदेशाने गुन्हा नोंदला झालेला असून बीड जिल्ह्यातील मंदिर मज्जित जमिनी घोटाळ्यामध्ये देखील उच्च न्यायालयामध्ये फौजदारी गुन्हे दाखल झालेले आहेत एवढेच नाही तर शेतकऱ्यांना पंचायत समितीमध्ये विहिरी नगरपंचायत ग्रामपंचायत मध्ये घरकुल वाटप यामध्ये देखील प्रचंड प्रमाणावर भ्रष्टाचार असून शेतकऱ्यांना पैसे द्यावे लागतात शेतकऱ्यांचे छोटे छोटे काम कुठेही पैसे दिल्याशिवाय होत नाहीत त्यामुळे बीड जिल्ह्यामध्ये आत्महत्येचा प्रमाण वाढलेला आहे बीड जिल्ह्यातील अनेक बँका बंद पडलेले आहेत लोकप्रतिनिधी यांची निष्क्रियता यामुळे लोकशाही धोक्यात असून सामान्य माणसाला हे प्रस्थापित लोक त्रासदायक आहेत.या मतदारसंघांमध्ये शरदचंद्र पवार साहेब यांनी निवडणूक लढण्याची संधी दिली तर नव्या चेहऱ्याला उमेदवारी मिळाली तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षात पक्षाने जो उमेदवार दिला जाईल जो नवा चेहरा दिला जाईल त्याला निवडून आणण्याचे काम आम्ही एक दिलाने करू असे ड. जाधव यांनी सांगितले. कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार राजेंद्र जगताप, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या डॉक्टर सेलचे प्रदेशाध्यक्ष नरेंद्र काळे, प्रदेशाउपध्यक्ष बाळासाहेब मिसाळ,डॉ.विलास सोनवणे, प्रदेश सरचिटणीस प्रा. सुशिलाताई मोराळे,आष्टी तालुका अध्यक्ष अण्णासाहेब चौधरी,काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष जुबेर चाऊस,माजी पंचायत समिती सदस्य गुलाबराव घुमरे,किशोर हंबर्डे, अमोल तरटे,कॉ.महादेव नागरगोजे,जिल्हा कार्यकारिणी सदस्य ड.सय्यद वहाब, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष डॉ. नदीम शेख,जिल्हा सरचिटणीस गणीभाई,अतुल शिंदे,शिवाजी पारखे,जिल्हा उपाध्यक्ष महादेव साके,दादासाहेब झांजे,गंगा आबा आजबे,जिल्हाध्यक्ष लीगल सेल सतीश गाडे,मुखराम पठाण,ड.ज्ञानेश्वर नाईकनवरे आदीसह महविकास आघाडीचे आजी माजी पदधिकारी उपस्थीत होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ड.वहाब सय्यद यांनी केले,प्रास्ताविक पक्षाचे पाटोदा तालुका अध्यक्ष शिवभूषण जाधव यांनी केले.

## पराभव समोर दिसताच भाजपचा रडीचा डाव:धार्मिक व जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न-विजय वडेट्टीवार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

भाजप आमदार नीतेश राणे यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्याचा काँग्रेसचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी चांगलाच समाचार घेतला. भाजपच्या नेत्यांनी दिलेल्या अजेंड्याप्रमाणे ते बोलत आहेत. असे वादग्रस्त वक्तव्य करून आपली राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न सुरू आहे. पराभव समोर दिसताच भाजपचा रडीचा डाव सुरू आहे, अशी टीका काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.विजय वडेट्टीवार म्हणाले की, भाजप निवडणुका हरत आहे. त्यामुळे मतांच्या ध्रुवीकरणासाठी धार्मिक आणि जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. मृताच्या टाळूवरील लोणी खाण्याची भाजपची नीती असून तेच नितेश राणे यांच्या मुखातून बाहेर येत आहे.विजय वडेट्टीवार म्हणाले की, नितेश राणे यांनी काँग्रेसमध्ये असताना हाफ चड्डीवाले जातीयवादी आहेत. ते आरक्षण देउ शकत नाही, अशी टीका



आरएसएसवर केली होती. मात्र आता सत्तेच्या खुर्चीवर असताना ते दोन धर्मांत आग लावण्याचे काम करत असतील तर सरकारने त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करावी. परंतु, त्यासंदर्भात शासनाची भूमिका स्पष्ट होत नाही. याचा अर्थ भाजपला महाराष्ट्रात दंगली घडवून, राज्य अस्थिर करायचे आहे. निष्पाप लोकांचा जीव घ्यायचा आहे. ही भाजपची सत्तेसाठी असलेली नीती आहे. महाराष्ट्रात भाजपला निवडणूक नको असेल तर त्यांच्याकडून दंगली घडवल्या जातील. त्यामुळे महाराष्ट्र अस्थिर आहे, म्हणून निवडणुका पुढे ढकला, असा अहवाल राज्यपालांमार्फत देउ शकतात.

## विधानसभेच्या रिंगणात आठवलेंनी फुंकले रणशिंग

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नागपूर (वृत्तसंस्था)

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. अशातच केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी देखील आता जागांची मागणी केली आहे. विधानसभा निवडणुकीसाठी १० ते १२ जागा द्याव्यात, अशी मागणी त्यांनी केली आहे. नागपूर येथे त्यांनी पत्रकार परिषद आयोजित केली होती, या प्रसंगी ते बोलत होते.

रामदास आठवले म्हणाले, वंचित बहुजन आघाडीला राज्यात म्हणावे तेवढे यश मिळालेले नाही. आम्ही लोकसभेला २ जागा मागितल्या होत्या, मात्र मिळाल्या नाहीत. आता विधानसभा निवडणुकीत आम्हाला १२ जागा द्याव्यात, अशी मागणी त्यांनी केली आहे. महाराष्ट्रात आम्ही १८ जागांची यादी केली आहे. त्यापैकी १२ जागा द्याव्यात तसेच विदर्भात किमान ४ जागा पाहिजे असल्याचे त्यांनी सांगितले आहे.पुढे बोलताना रामदास आठवले म्हणाले, माझ्या पक्षासोबत मोठ्या प्रमाणात दलित मतदार आहेत. आम्हाला भाजपच्या कोट्यातून मानू नये, तर भाजप, शिंदे आणि अजित पवारांच्या कोट्यातून ४-४ जागा द्याव्या, म्हणजे आम्हाला १२ जागा मिळतील. येणाऱ्या एनडीए सरकारमध्ये आम्हाला मंत्री पद द्यावे, तसेच २ महामंडळ द्यावे, अशी मागणी आठवले यांनी केली आहे.

## विधानसभेला निवडून आल्यास मिळणारे मानधन देखील गोरगरीब मुलांच्या शिक्षणासाठी देणार : बादशाहभाई शेख


### दौंड शहरातील आठवडे बाजारातुन बादशाह भाई शेख यांना सर्वाधिक पसंती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

दौंड । बबनराव धायतोंडे

दौंड तालुक्यातील विधानसभेचे राजकीय वातावरण चांगलेच तापू लागेले असून सर्वच राजकीय नेत्यांनी कंबर कसलेली पाहायला मिळत आहे.परंतु अद्याप माध्यमांशी बोलताना कोणीही दिसत नाही.राजकारणातील बेरीज वजाबाकीची गणिते सर्वच राजकीय उमेदवार करू लागले आहेत.

दौंड तालुक्यातील विधानसभेच्या सर्व उमेदवारांनी वैयक्तिक गाठीभेटी घेण्यावर भर दिला असला तरी अनेक उमेदवार दौंड विधानसभेच्या रिंगणात उतरणार हे मात्र नक्की,दौंड तालुक्यातील जनतेच्या मनात नेमकं काय चाललं आहे,दौंड तालुक्याला कोण




आमदार पाहिजे,काय आहे नेमकं जनतेच्या मनात ते आमचे दै.लोकनेता चे दौंड तालुका प्रतिनिधी बबनराव धायतोंडे यांनी शहरातील आठवडे बाजारात चाचपणी केली असता लोकांच्या चर्चेतून दौंड नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष बादशाहभाई शेख यांच्या नावाला सर्वाधिक पसंती असल्याचे नागरिकांनी सांगितले.

तसेच बादशाहाभाई शेख यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की जर दौंड विधानसभेला मी निवडून आलो तर मला मिळणारे मानधन देखील मी गोरगरिब मुलांच्या शिक्षणासाठी देणार,जनतेच्या सेवेसाठी २४ तास उपलब्ध राहून लोकांची सेवा करणार,आणि दौंड तालुका सुजलाम सुफलाम होण्यासाठी प्रयत्न करणार .त्यामुळे दौंड तालुक्यातील मायबाप जनतेने मला विधानसभेला एक वेळेस संधी द्यावी असे आव्हान केले आहे.

## जिजाऊ ब्रिगेड दौंड तालुका रणरागिणींच्या लढ्याला यश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

दौंड । बबनराव धायतोंडे

दौंड तालुक्यातील जाऊजीबुवाची वाडी ते होलेवाडी येथील रस्त्याचे काम येत्या २० ऑक्टोंबर पर्यंत निविदा प्रक्रिया पूर्ण करून हा रस्ता सिमेंट काँक्रेट मध्ये करून देणार व नविन मुळा-मुठा कालव्या वरील पूल तात्काळ दुरुस्त करून देण्यात येईल असे लेखी हमीपत्र उपोषण स्थळी येऊन सार्वजनिक बांधकाम विभाग मुख्यअधिकारी सोनवणे आणि शिंदे यांनी दिली.

हा रस्ता झाल्यानंतर बोरीऐंदी,कासुर्डी, ताम्हाणवाडी,भरतगाव,डाळिंब,बोरीभडक या गावांना जोडणारा मुख्यरस्ता म्हणून




येथील नागरिकांना भविष्यात निश्चितच फायदा होईल असे उपोषणकर्ते जिजाऊ ब्रिगेड दौंड तालुका अध्यक्षा सारिकाताई भुजबळ यांनी सांगितले.तसेच हे उपोषण यशस्वी होण्यासाठी बोरीऐंदी ग्रामस्थांनी आर्थिक मदत केली.तसेच संपूर्ण कुटुंब या आंदोलनात सकाळी ९ वाजल्यापासून उपस्थित होते त्यामुळे ग्रामस्थांचे आभार मानून त्यांचे कौतुक सारीकाताई भुजबळ यांनी केले. या लढ्यात ग्रामस्थांची ऐकी पाहिला मिळाली.त्यामुळे हे आंदोलन यशस्वी झाल्याचे बोलले जात आहे.

## शेवटचे हसू...डोळ्यात अश्रू...अन विश्वास गमावला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । बाजीराव गायकवाड

निशब्द, निशब्द निशब्द.... काय बोलावं काय लिहावं ,काही सुचत नाही. कारण घटना ही तशीच आहे. आज सकाळी सकाळी मी पुण्याहून ट्रेनमध्ये येत असताना अचानक माझा मावस भाऊ विक्रम उर्फ विकी याचा मला फोन खणखणला! दादा मला आज माझा भाऊ विशू दादा सोडून गेला आहे. आज पासून मी पोरका झालो आहे .तू माझा सांभाळ कर!

मी रेल्वे मध्ये होतो नांदेडच्या दिशेने येत होतो .पण तो आलेला फोन माझे काळीज फाटावे असे झाले.जसे काही मला काहीच सुचत नव्हते .पण मीही त्याला विश्वासात घेऊन धीर दिला पण विक्रमचं पुढील आयुष्य हे काळोखात आहे हे मला सत्य सतत समोर दिसत होते.

विश्वास प्रकाश खांडेकर हे एक नांदेड मधील प्रख्यात संस्कृतचे प्राध्यापक उर्फ आदर्श शिक्षक म्हणून प्रसिद्धी होती. त्यांच्या हाताखालून शेकडोच्या वर विद्यार्थी ही घडलेली आहेत. विश्वास म्हणजे एक ताठर भूमिका घेणारा, जिद्दी, सतत अथक परिश्रम करणारा, शेवटच्या क्षणापर्यंत जगण्याची जिद्द बाळगणारा, व्यवहारिक, विश्वासू, प्रामाणिक विद्यार्थी प्रिय शिक्षक होते. विद्यार्थ्यांमध्ये ते आवडते शिक्षक जरी असले तरीही ते कडक व शिस्तप्रिय शिक्षक होते. त्यामुळेच त्यांचे सिडको व नांदेड परिसरात एक विशेष नाव होते. पण त्यांनी अतिशय गरीब परिस्थितीतून मार्ग काढत कुटुंबाला सांभाळ केला. आणि जेवढे सुख देता येईल तेवढे सुख



त्यांनी देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या जीवनाचा विकास झाला .पण अति कष्टामुळे त्यांच्या जीवनाकडे ज्यावेळेस आनंद घ्यायची वेळ आली त्यावेळेस तब्येतीने त्यांची साथ सोडली व गेल्या अनेक महिन्यापासून ते एका विशिष्ट आजाराने आजारी होते. पण अखेर आज त्यांची प्राणज्योत मावळली.

विक्रम उर्फ विकी तसेच विश्वास हे दोघे सख्खे भाऊ पण सुरुवातीला काही वर्षाखाली वडील तर गेल्या दोन वर्षाखाली त्यांची आई तर आता खुद्द विश्वास खांडेकर यांनी विकीची साथ सोडल्यामुळे या घरावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

गेल्या चार दिवसा खाली मी स्वतः विश्वास खांडेकर एवढे आजारी असताना त्यांना हसविले ते हसत असताना बऱ्याच दिवसानंतर त्यांच्या चेहऱ्यावरचे हसू बघितल्यानंतर त्यांच्या कुटुंबात आनंद अश्रू आले पण आज ते पडद्याआड जात असताना मात्र यांच्या कुटुंबातील विश्वास गमावला याचे मात्र खूप दुःख होत आहे. वृत्त लिहित असताना माझ्याही मनाला खूप यातना होतात .पण नियतीचा खेळ आहे. जेव्हा शरीर चांगले होते त्यावेळेस यांच्याकडे पैसा नव्हता आज पैसा आहे पण शरीराने साथ सोडली. विश्वास खांडेकर यांची मेहनत पाहिली तर कदाचित आपण झोपू शकणार नाहीत. पण त्यांच्या जीवनामध्ये त्यांचा भाऊ विकी याचा सिंहाचा वाटा आहे हे सत्य टाळता येऊ शकत नाही. कारण त्यांच्या प्रत्येक सुख आणि दुःखात हा विकी विश्वास सोबत सावली प्रमाणे राहिला आहे. त्यामुळे विश्वासाचे शेवटचे हसू ....आणि डोळ्यात अश्रू... अखेर विश्वास गमावला असे वाटत आहे. माझ्या या मावस भावाला भावपूर्ण श्रद्धांजली !

-ओंकार लव्हेकर,कंधार

# नायगाव मध्ये जुलूस ए मोहम्मदी मोठ्या उत्साहात साजरा




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । प्रतिनिधी**

इस्लाम धर्माचे प्रेषित हजरत मोहंमद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त नायगाव येथे ईद-ए-मिलादुन्नबी च्या अनुषंगाने जुलूस ए मोहम्मदी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी जुलूसमध्ये मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव,लहान मुले,मुली व परिसरातील असंख्य समाज बांधव सहभागी झाले होते.

दरवर्षी प्रमाणे यंदाही इस्लाम धर्मांचे अंतिम प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त दि.२२ सप्टेंबर २०२४ रोजी नायगाव येथे ईद-ए-मिलादुन्नबी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली मोठ्या जयघोषात निघालेल्या व जुलूस मध्ये नायगाव शहरासह परिसरातील समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते यावेळी जागोजागी सरबत,फळे,लड्डू,चॉकलेट, बिस्किट व पाणी बॉटल वाटप करण्यात आले सकळी १० वाजताच (जुलूस ए मोहम्मदी) मदरसा बनात मिरलणुकीला प्रारंभ झाले त्यानंतर नांदेड हैद्राबाद हायवे मार्गावरून हेडगेवार चौक, शिवाजी चौक,नगरपंचायत रोड होत हजरत तवकल शहावली दर्गाह येथे मिरवणुक पोहचल्यानंतर फातेहखानी सलाम व दुवा झाल्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली यावेळी सय्यद रहिमसेठ,जुनैद पठाण,अ.करीम चाऊस,शेख अयुबभाई,सय्यदभाई मुल्ला,हाजी तोफीक बागवान,इशाभाई,नईम भैंसेकर,इमरान बागवान,शेख आसीफ,पठाण समीर, शेख रफीक,बुरहान कच्छी,शेख मैनोदीन,सय्यद सिंकदर,साजीद पठाण,बिलाल पठाण,जाफर सय्यद,फेरोज पठाण,मोहम्मद चाऊस,शेख माजीद हालदेकर,सय्यद फयाज,खदीर बागवान,मुजाहिद सिद्दिकी,मुहीब शेठ कच्ची,अंजार बिलोलीकर,अबू बकर मुस्तजर,आदम रहीमतुल,बाबू जिलानी साब,बबलू चांद साब,जाफर जलाल साब यासह अंसख्य समाज बांधव उपस्थित होते.

> **"** केशवराव पा.चव्हाण, माधवअप्पा बेळगे, हणमतराव पा.चव्हाण,शिवराज पाटील होटाळकर,विजय पा.चव्हाण,विठ्ठल पा.गवळी,संजय चव्हाण,शरद भालेराव,पांडुरंग पा.चव्हाण,नारायन पा.जाधव,माणिक पा. चव्हाण,अजिंक्य पा.कल्याण यासह अनेकांनी जुलूस ए मोहम्मदी मध्ये सहभागी होऊन मुस्लिम बांधवाना भरभरून शुभेच्छा दिल्या.

# देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन

## ५०० तरुणांनी केले रक्तदान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवाडा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते भारतीय जनता युवा मोर्चा कडे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते ,२३ सप्टेंबर रोजी भारतीय जनता पार्टी कार्यालय हिंगोली या ठिकाणी सकाळी ११ ते ५ वाजेपर्यंत रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते यामध्ये मोठ्या प्रमाणात भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा व सर्व पद पद अधिकारी व कार्यकर्तेनी रक्तदान केले यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटक हिंगोली विधानसभेचे आमदार तानाजीराव मुटकुळे, भारतीय जनता पार्टीचे जिल्हा अध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी जिल्हा अध्यक्ष माजी खासदार शिवाजीराव माने, रामरावजी वडकुते, गजाननरावजी घुगे ,रामदास पाटील सुंमठाणकर, मिलिंद यबल, कैलास काबरा ,उमेश नागरे, कैलास शहाणे, उमेश गुट्टे ,राजेश गोटे, व सर्व भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी युवा मोर्चाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते, तर या रक्तदान शिबिराचे आयोजन भारतीय जनता युवा मोर्चाचे पद अधिकारी व कार्यकर्ते यांनी केले होते यामध्ये अनेक पद अधिकारी व कार्यकर्त्यांनी रक्तदान केले.



# होलार समाजाच्या मागण्यासाठी मुंबईच्या आझाद मैदानावर आमरण उपोषणाचा इशारा

लोकनेता न्यूज नेटवर्क **बीड । विजय रोडे**

अखिल भारतीय होलार समाजाच्या वतीने या समाजाच्या विविध मागण्यासाठी आज पासून सोमवार तारीख २३ सप्टेंबर पासून मुंबई येथील आझाद मैदानावर या संघटनेचे प्रदेशाध्यक्ष माननीय रणजीत दादा ऐवाळे पाटील हे आमरण उपोषणास बसणार असून त्यांना पाठिंबा दर्शविण्यासाठी सर्व समाज बांधवांनी आझाद मैदानावर हजर राहण्याचे आवाहन मराठवाड्यातील युवा नेते चंद्रशेखर केंगार यांनी केले आहे



महाराष्ट्रातील होलार समाज वर्षानुवर्ष शासन दरबारी उपेक्षीला गेला आहे या समाजाच्या हिताकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी समाजबांधव एकवटले असून या समाजाच्या शैक्षणिक आर्थिक व राजकीय सद्य परिस्थिती जाणून घेण्यासाठी अभ्यास आयोग नेमण्यात यावा या समाजाच्या जातीच्या नोंदी चुकीच्या झाल्या आहेत त्या दुरुस्ती करण्यासाठी समिती गठन करण्यात यावी होलार समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी आर्थिक विकास महामंडळ स्थापन करावे जोपर्यंत विकास महामंडळ स्थापन होत नाही तोपर्यंत संत रोहिदास व चर्मोद्योग महामंडळावर या समाजाचा प्रतिनिधी नेमण्यात यावा अशा विविध मागण्यासाठी अमरण उपोषणाचा इशारा देण्यात आला असून एक दिवस जातीसाठी होलार समाजाच्या अस्तित्वासाठी समाज बांधवांनी आझाद मैदानावर आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# ५० खोके एकदम ओके आणि वाघांचे झाले बोके:खा.अमोल कोल्हे यांची बंडखोर आमदारांवर टीका

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**चोपडा (वृत्तसंस्था)**

एकनाथ शिंदे यांनी समर्थक आमदारांसह उद्धव ठाकरे यांच्याशी बंड पुकारून भाजपसोबत सत्ता स्थापन केली होती. या बंडाच्या निषेधार्थ महाविकास आघाडीकडून वेळोवेळी '५० खोके, एकदम ओके' अशी घोषणाबाजी करत टीका करण्यात आली होती.

आता शरद पवार गटाचे खासदार अमोल यांनी यापुढेही जात '५० खोके, एकदम ओके आणि वाघांचे झाले बोके' असे विधान केले आहे. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाची शिवस्वराज्य यात्रा रविवारी जळगाव जिल्ह्यातील चोपडा येथे होती. यावेळी अमोल कोल्हे यांनी बंडखोर आमदारांसह महायुतीवर हल्लाबोल केला.

स्वतःला महाशक्ती म्हणवणाऱ्यांच्या डोळ्यादेखत महाराष्ट्रातून उद्योगधंदे गुजरातला पळवले जात आहेत, महाराष्ट्रातील युवकांच्या हक्कांचा रोजगार पळवला जात आहे. गुजराती बॉसच्या ताटाखालचे मांजर असलेल्या महाराष्ट्रातील सत्ताधाऱ्यांना याचे काहीही सोयरसुतक नाही. अशा सत्ताधाऱ्यांना आपण धडा शिकवायचा आहे असे आवाहन अमोल कोल्हे यांनी उपस्थितांना केले. खासदार अमोल कोल्हे म्हणाले ही, जळगाव जिल्ह्यात शिवसेनेच्या पाच आमदारांना निवडून दिल्यानंतर जनतेला वाटले होते की, आम्ही शिवसेनेचे वाघ निवडून दिले. ५० खोके, एकदम ओके आणि वाघांचे झाले बोके. जळगाव जिल्ह्यात शरद पवारांच्या ताकदीवर निवडून आलेल्या एका आमदाराने मंत्री पदाच्या खुर्चीसाठी गद्दारी केली, अशा शब्दांत अमोल कोल्हे यांनी मंत्री पाटील यांच्यावर टीका केली आहे. जळगाव जिल्ह्यातील ६ आमदारांनी जनतेशी गद्दारी केली आहे. याचे उत्तर जनतेला द्यावे लागेल....तेव्हा कुठे गेले होते तुमचे हिंदुत्व अमोल कोल्हे म्हणाले की, आम्ही हिंदुत्वासाठी बंडखोरी केली, असे गद्दार आमदार म्हणत होते.

# ज्यांनी मदत केली त्यांनाच महाजन संपवतात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**जामनेर (वृत्तसंस्था)**

ज्यांनी मंत्री गिरीष महाजन यांना मदत केली, त्यांनाच ते संपवण्याची भाषा करतात, अशी टीका जेष्ठ नेते एकनाथ खडसे यांनी केली आहे. जामनेर मतदारसंघातील भाजप नेते आणि माजी जिल्हा परिषद अध्यक्ष दिलीप खोडपे यांनी २१ सप्टेंबर रोजी राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. या कार्यक्रमावेळी एकनाथ खडसे बोलत होते. दिलीप खोडपे हे मंत्री गिरीष महाजन यांचे निकटवर्तीय मानले जातात.

जामनेरमधील या प्रवेश सोहळ्यात एकनाथ खडसे यांनी गिरीष महाजन यांच्या जोरदार टीकास्त्र सोडले. एकनाथ खडसे म्हणाले ही, या नाथाभाऊंमुळे गिरीष महाजन राजकारणात जन्माला आले, याचा विसर त्यांना पडला आहे. जामनेर विधानसभा मतदारसंघ शिवसेनेचा होता. पुढे हा मतदारसंघ भाजपने घेतला. आणि शिवसेनेला भुसावळचा मतदारसंघ देण्यात आला. त्यातून गिरीष महाजन यांचा राजकीय जन्म झाला.एकनाथ खडसे म्हणाले ही, निवृत्त शिक्षकाचा मुलगा असल्यामुळे गिरीष महाजन यांच्या थोडेफार संस्कार असतील, असे आम्हाला वाटले होते. पण हे तर फारच करामती निघाले. जिथे जातील, तिथे ते दूध काढतात. ते काय काय करतात हे संपूर्ण राज्याला माहीत झाले आहे.

## विकासकामांच्या नावाखाली तोडलेली झाडे लावणार कधी ?

# वनविभागाच्या ढिसाळ कारभारामुळे बीड जिल्ह्याचे वाळवंट-डॉ.गणेश ढवळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात २.४ ईतके कमी वनक्षेत्र असुन निसर्गाचा समतोल राखण्यासाठी ३३ टक्के वनक्षेत्र अपेक्षित असताना वनक्षेत्र कमी असल्याने वारंवार दुष्काळाचे संकट ओढावत आहे.हरितक्षेत्र वाढवण्यासाठी शासनाकडून झाडे लावा झाडे जगवा जाहिरात बाजी करत कोट्यवधींचा खर्च करण्यात येतो.मात्र वृक्षलागवड कागदोपत्रीच दिसून येते.त्यात भरीस भर म्हणून विकासकामांच्या नावाखाली रस्ता रुंदीकरण अथवा रेल्वे लाईन ब्राड रोडवेज कामासाठी ५० वर्षापुर्वीचे महाकाय चिंच ,लिंब ,वड,पिंपळ,नांदुरकी आदि वृक्षांची कत्तल करण्यात ये मात्र पर्यावरणाचे रक्षण व्हावे यासाठी पाचपट झाडे लावणे बंधनकारक असताना काम पूर्ण होऊन ५ वर्षे उलटुनही संबंधित कंत्राटदार कंपनीकडून वृक्षलागवड करण्यात येत नाही.सामाजिक कार्यकर्ते यांच्या लेखी तक्रारी, आंदोलनानंतर सुद्धा जिल्हा प्रशासन आणि विभागाच्या ढिसाळ कारभारामुळे आणि अर्थपूर्ण दुर्लक्षामुळे बीड जिल्ह्याचे वाळवंट झाले असल्याची खंत सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे आणि रामनाथ खोड यांनी बोलुन दाखवली.

अहमदनगर - बीड - परळी नविन ब्रॉड गेज लाईन प्रकल्पासह राष्ट्रीय महामार्ग २११ धुळे ते सोलापूर हायवेवरील जवळपास ५० महाकाय वृक्ष वनविभागाच्या परवानगीने तोडण्यात आली आहेत.मात्र याचवेळी वृक्ष लागवडी बाबत जिल्हा प्रशासन आणि वनविभाग मुग गिळून गप्पच आहे. जागतिक तापमान वाढीचे युग संपुन होरपळीचे युग सुरू झाले असुन ठोस निर्णय घेण्याचे आवाहन संयुक्त राष्ट्र संघटनेने केले असुन महाराष्ट्र शासनाने



भविष्यातील धोका ओळखून मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी पर्यावरण विषयक महत्वाचे निर्णय घेऊन अंमलबजावणी साठी एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पर्यावरण व शाश्वत विकास कृती समितीची स्थापना करण्यात आली असुन पर्यावरण व शाश्वत विकासासाठी करत असलेल्या कार्याची दखल थेट आंतरराष्ट्रीय पातळीवरून घेऊन दुसरा जागतिक कृषी पुरस्कार एकनाथ शिंदे यांना १८ सप्टेंबर रोजी प्रदान करण्यात आला आहे. मात्र दुसरीकडे बीड जिल्हा प्रशासन आणि वनविभाग यांना याचे काहीही सोयरेसुतक नसल्याचे दिसून येत असल्याची खंत डॉ.गणेश ढवळे यांनी बोलून दाखवली.

बीड जिल्ह्यातील धुळे ते सोलापूर, बीड ते अहमदनगर, अहमदपूर ते अहमदनगर आणि बीड ते परळी राष्ट्रीय महामार्गावरील महाकाय वृक्षांची रस्ते रूदीकरणाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर कत्तल करण्यात आली मात्र त्या मोबदल्यात शासकीय नियमानुसार ५ पट वृक्षलागवड आणि वृक्षांच्या पुनःवसनाचे रस्ते काम पूर्ण होऊन ५ वर्षं उलटूनही अद्याप वृक्षलागवड करण्यात आली नाही त्याचं काय झालं असा संतप्त सवाल पर्यावरण प्रेमी रामनाथ खोड यांनी केला असुन वनविभागातील अधिकारी आणि रस्ते कामातील कंत्राटदार यांची मिलीभगत असल्याने परिस्थिती गंभीर झाली असल्याचे म्हटले आहे.

## परळीत धनगर जमातीच्या आरक्षणासाठी आक्रमक

# २३ सप्टेंबर रोजी होणाऱ्या रस्ता रोको आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे-शिवदास बिडगर,विश्वनाथ देवकते,चंद्रकांत देवकते

## धनगर आरक्षण चलो परळी-वैद्यनाथ चलो परळी-वैद्यनाथ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

पंढरपूर , लातूर , नेवासा या ठिकाणी उपोषणाला बसलेल्या धनगर जमातीच्या उपोषणकर्त्यांना पाठिंबा म्हणून धनगर आरक्षण अंमलबजावणी एसटी प्रमाणपत्र मिळण्यासाठी सोमवार दिनांक २३/९/२४ रोजी सकाळी १० वाजता परळी-वैद्यनाथ येथील ईटके कॉर्नर येथे रस्ता रोको चे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व परळी-वैद्यनाथ विधानसभा मतदारसंघातील सकल धनगर समाजच्या रास्ता रोको मध्ये सहभागी होऊन आपल्या हक्काच एस टी आरक्षण मिळवण्यासाठी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आव्हान धनगर समाजाचे युवा नेते शिवदास बिडगर, विश्वनाथ देवकते, चंद्रकांत देवकते व सकल धनगर समाज परळी-वैद्यनाथ जिल्हा बीड यांनी केले आहे.

आदिवासी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता धनगर समाजाला एसटी या प्रवर्गातून आरक्षण द्यावे. या प्रमुख मागणीसह पंढरपूर, लातूर व नेवासा येथे सुरू असलेल्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी तसेच या सरकारने तात्काळ मागणीचे परिपत्रक काढावे या मागणीसाठी रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे.गेल्या अनेक वर्षांपासून धनगर जमातीचा अनुसूचित जमाती प्रवर्गामध्ये समावेश करावा अशी मागणी आहे. २०१४ साली महायुतीचे सरकार असताना पहिल्या कॅबिनेट मध्ये धनगर जमातीच्या आरक्षणाचा प्रश्न निकाली काढू असे आश्वासन तत्कालीन मुख्यमंत्री यांनी शब्द दिला होता. आताही सरकार त्यांचेच आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न निकाली काढावा अन्यथा या सरकारला पाडल्याशिवाय धनगर समाज स्वस्त बसणार नाही असा इशारा दिला.



आदिवासी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता धनगर समाजाला एसटी या प्रवर्गातून आरक्षण द्यावे. या प्रमुख मागणीसाठी सोमवार दि. २३/९/२४ रोजी सकाळी १० वाजता परळी-वैद्यनाथ येथील ईटके कॉर्नर येथे रस्ता रोको चे आयोजन करण्यात आले आहे. तरी समाज बांधवांनी या आंदोलनाला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन धनगर समाजाचे युवा नेते शिवदास बिडगर, विश्वनाथ देवकते, चंद्रकांत देवकते व सकल धनगर समाज परळी-वैद्यनाथ जिल्हा बीड यांनी केले आहे.

# श्रीगोंदा खादी ग्रामोद्योग संघाचे कर्ज प्रकरणे लवकरच सुरू करणार-प्रा.बापूसाहेब गायकवाड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

श्रीगोंदा खादी ग्रामोद्योग संघ हा मोडकळीस आलेल्या असताना जिल्हा सहकारी बँकेचे संचालक माजी आमदार राहुल जगताप यांच्या सहकार्याने उर्जित अवस्थेत आणुन बारा बलुतेदार सभासदांना जिल्हा सहकारी बँकेच्या माध्यमातून कर्ज वाटप लवकरच सुरू करणार असल्याचे प्रतिपादन खादी ग्रामोद्योग संघाचे चेअरमन बापूसाहेब गायकवाड यांनी सर्व साधारण सभेत केले.

श्रीगोंदा तालुका खादी ग्रामोद्योग संघाची ५३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ग्रामोद्योग संघाच्या प्रशिक्षण केंद्रात पार पडली सभेचे अध्यक्ष बापूसाहेब गायकवाड यांनी सांगितले की अनेक दिवसांपासून जिल्हा बँकेची थक बाकी असल्याने कारणाने कर्ज प्रकरणे सध्या बंद आहे. घेतलेल्या कर्जदारांनी कर्ज भरले नसल्याने संस्था ही मागील काही वर्षांपासून मोडकळीस आली होती. परंतु आपण सत्तेत आल्यापासून मोडकळीस आलेल्या संस्थेला ऊर्जित अवस्थेत आणण्याचा प्रयत्न करत आहेत अवघ्या सहा महिन्यांत दहा लाख रुपये संस्थेची कर्ज वसुली करण्यात आली आहे. त्यामुळे जिल्हा बँकेचे चेअरमन माजी शिवाजीराव कर्डिले व बँकेचे संचालक माजी आमदार राहुल जगताप




यांनी श्रीगोंदा खादी ग्रामोद्योग संघास सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे. साध्या विश्वकर्मा योजना, विशेष घटक योजना व खादी ग्रामोद्योग मंडळ यांच्या योजना चालू असून त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन गायकवाड यांनी केले.

यावेळी कार्यक्रमास खादी ग्रामोद्योग संघाचे अंकुश शिंदे, नंदू ससाणे, भगवान गोरखे तसेच जेष्ठ संचालक वसंतराव सकट, संपत कुचेकर, कांतीलाल कोकाटे, बाळासाहेब गायकवाड, ज्ञानदेव शिरवाळे, रतन ससाणे यांची भाषणे झाली. यावेळी व्हाचेअरमन बबनशेठ श्रीराम,संचालक नानासाहेब ससाणे, धनंजय लोखंडे , रेवतीताई घाडगे, मीराताई शिंदे, दिलीप तोरडमल, रमेश कळमकर, सुनील काळे,माजी संचालक मनोज घाडगे यांच्यासह मोठ्या संख्येने सभासद महिला पुरुष उपस्थित होत्या. सभेचे अहवाल वाचन सचिव विनायक ससाणे यांनी केले तर आभार मयूर गोरखे यांनी केले.

> ❝ श्रीगोंदा ग्रामोद्योग संघाची नवीन इमारत बांधकाम करण्यासाठी जिल्हा बँकेच्या वतीने मोठ्या प्रमाणात निधीचा पुरवठा करू असे आश्वासन जिल्हा बँकेचे चेअरमन शिवाजीराव कर्डिले व संचालक माजी आमदार राहुल जगताप यांनी दिले आहे. तसेच जो कर्जदार तात्काळ थकबाकी भरेल त्यास ४ टक्के सुट देणार असल्याची असल्याची माहिती संघाचे चेअरमन प्रा.बापूसाहेब गायकवाड यांनी दिली.

# मी लोणारकर टिमने राबविली धारातीर्थी व सिता न्हाणी परिसरात प्लास्टिक व कचरामुक्त मोहीम

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार सरोवर । विनायक कुटे**

मी लोणारकर’ टीम प्रत्येक रविवार ला लोणार येथील व जवळपासची वारसा स्थळे, मंदिरे, जंगल प्लॅस्टिक मुक्त करत असतात हा उपक्रम गेल्या ८ वर्षांपासून सतत चालू आहे आज रविवार निमित्त धारातीर्थ ते यज्ञेश्वर मंदिर व लोणार अभयारण्याचा सीता नान्ही चा धबदबा हा भाग प्लॅस्टिक मुक्त व कचरा मुक्त केला आहे या वेळी टीम सोबत वन्यजीव विभागाचे उउवस(Chief Conservator of Forests) मुख्य वनसंरक्षक आदर्श रेड्डी सर यांचा ही सहवास लाभला या वेळी मी ‘लोणारकर टीम’ चे सदस्य



संतोष जाधव, सचिन कापुरे, विलास जाधव, विजय गोरे, किशोर आंबेकर, समीर शहा, पृथ्वीराज भंडारे, प्रविण इंगळे, विनय कुलकर्णी, शैलेष सदार तसेच इतर पर्यटक ही टीम सोबत स्वछता सेवेत सहभागी झाले कचरा प्लॅस्टिक जमा करून बैग मधे वर आणून नगर परिषद च्या कचरा गाडीमध्ये हा कचरा टाकण्यात आला.

# हिंगोली विधानसभेतील ग्रामीण रस्त्यासाठी (३०५४) हेड मधून दोन कोटी निधी मंजूर

## रामदास पाटील सुंमठणकर यांच्या मागणीला यश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

हिंगोली विधानसभेतील ग्रामीण रस्त्यासाठी भाजप नेते रामदास पाटील सोमठाणकर यांनी वेळोवेळी कागदपत्राची पूर्तता करून राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे मागणी केली होती याच मागणीला यश आल्याचे दिसून आले आहे हिंगोली विधानसभेतील ग्रामीण



रस्त्यासाठी ग्रामविकास विभाग अंतर्गत ३० ५४ हेड मधून एकूण दोन कोटी निधी मंजूर झाला असून यादी देखील रामदास पाटील सुंठाणकर यांनी २५ १५ हेड अंतर्गत २२ गावांना दोन कोटी निधी मंजूर करून आणला होता तर हिंगोली ग्रामीण साठी चार कोटी निधी मंजूर झाल्याने रामदास पाटील सुंठणकर यांनी राज्याचे ग्रामविकास मंत्री आदरणीय गिरीश महाजन यांचे आभार मानले.

# आझाद समाज पार्टी( कांशीराम) च्या सिंदखेड राजा तालुका अध्यक्ष पदी रामदास कहाळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । प्रतिनिधी**

तालुक्यातील आडगाव राजा या गावचे माजी सरपंच तथा सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे काम सातत्याने करत राहणारे पत्रकार रामदास कहाळे यांची खासदार चंद्रशेखर आझाद संस्थापक अध्यक्ष आझाद समाज पार्टी ( कांशीराम) या पक्षाच्या सिंदखेड राजा तालुका अध्यक्ष पदी निवड जिल्हाध्यक्ष भाई सिद्धांत वानखेडे यांनी जिल्हा सल्लागार पत्रकार सचिन खंडारे, यांच्या उपस्थितीत केली आहे.



रामदास कहाळे हे गेल्या अनेक वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असून आडगाव राजा या गावचे सरपंच, उपसरपंच राहिले असून सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे काम करत आहे खासदार चंद्रशेखर आझाद यांच्या आझाद समाज पार्टी (कांशीराम) या पक्षाच्या सिंदखेड राजा तालुका अध्यक्ष पदी रामदास कहाळे यांची निवड जिल्हाध्यक्ष भाई सिद्धांत वानखेडे यांनी केली आहे सिंदखेड राजा तालुक्यात पक्ष वाढीसाठी काम करून पक्षाला मजबूत करण्याचे जिल्हाध्यक्ष भाई सिद्धांत वानखेडे यांनी नियुक्ती पत्रात म्हटले आहे.



भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप यांनी अलिबाग मुंबई येथील दै. कृषीवल कार्यालयात भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आदरणीय माजी आमदार जयंत पाटील यांची दिनांक- २२/०९/२०२४ रविवार रोजी सदिच्छा भेट घेतली. या प्रसंगी शेकापचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# सत्यपाल मलिक यांचा मविआला पाठिंबा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्याची विधानसभा निवडणूक जसजशी जवळ येत आहे, तसतशी राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या भेटीगाठी वाढल्या आहेत. जम्मू-काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांनी रविवारी ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. या भेटीमुळे राजकीय वर्तुळात विविध चर्चा रंगत आहेत.

जम्मू-काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांनी मुंबईतील मातोश्री येथे उद्धव ठाकरे यांची भेट घेतल्यानंतर माध्यमांशी संवाद साधला. यावेळी मलिक यांनी आगामी विधानसभा निवडणुकीवर भाष्य करत भाजपवर टीका केली आहे. विधानसभा निवडणुकीत आपला महाविकास आघाडीला पाठिंबा आहे. निवडणुकीत प्रचार सभांसाठी महाराष्ट्रात येणार आहे. या निवडणुकीत महायुतीसह भाजपचा पराभव होणार आहे, असे ते म्हणाले.महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक देशातील राजकीय परिस्थितीवर परिणाम करेल, असे मलिकांनी म्हणले आहे.

# वडगाव येथे शैक्षणिक साहित्य वाटपाचे आयोजन

लोकनेता न्यूज नेटवर्क **नांदेड । बाजीराव गायकवाड**

वडगाव ता.लोहा येथील माजी पोलीस पाटील कै. देवराव दाजीबा पाटील काळे यांच्या स्मरणार्थ वडगाव येथे दि. २३ सप्टेंबर सोमवारी शैक्षणिक साहित्य वाटपाचे आयोजन करण्यात आले आहे.



यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ. प्रणिताताई देवरे चिखलीकर ( सामाजिक कार्यकर्त्या ) या राहणार आहेत .तर प्रमुख पाहुणे म्हणून मा.संदीप माळोदे ( अति. मु. का .आ. जि.प. नांदेड ) , श्री गोविंद नांदेडे ( सेवानिवृत्त शिक्षण संचालक ) , शिवाजीराव कपाळे ( माजी अति. मु.का.आ.) , मा. डॉ. श्रीमती सविता बिरगे ( शिक्षणाधिकारी (प्रा.) जि.नांदेड ) , विजय बेतीवार ( कृषी विकास अधिकारी जि.प. नांदेड ) ,संजय पाटील कऱ्हाळे ( माजी शिक्षण सभापती ) , तर प्रमुख उपस्थिती डि.के . आडेराघो ( गटविकास अधिकारी पंचायत समिती लोहा ) , आनंदराव पाटील शिंदे ( माजी सभापती पंचायत समिती लोहा) , सतिश व्यवहारे ( गटशिक्षणाधिकारी प.स. लोहा ) , विनायक पाटील काळे ( सरपंच वडगाव ) , पंजाबराव पाटील काळे ( युवा उद्योजक, वडगाव ) , यांच्या सह अनेक मान्यवर मंडळी उपस्थित राहणार आहेत. तरी परिसरातील शिक्षण क्षेत्रातील नागरिकांनी , शिक्षणप्रेमीनी उपस्थित राहाण्याचे आवाहन सचिन पाटील काळे , ( मोहीम अधिकारी जि.प. नांदेड ) , पुष्पलता गोरडे - लोंढे ( ग्रामसेविका , पं.स.लोहा ) यांनी केले आहे.


# राष्ट्रीय महामार्गाच्या पथदिव्यांचं उद्घाटन झाले शाही

## मात्र श्रीफळ फोडण्याची सत्ताधाऱ्यांनी एकच केली घाई

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**केज । प्रतिनिधी**

लॉक डाऊनचा २०१९ चा काळ तसा प्रत्येकाच्या आठवणीत राहण्यासारखाच आहे. कोविड १९ व्हायरसने संपूर्ण जगभरात थैमान घातले होते. त्यातच २०१९ म्हणजे लॉक डाऊन पडण्याच्या अगोदर मांजरसुंबा ते धायगुडा पिंपळा या राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू झाले. रस्ता खोदकामाने याची सुरुवात झाली. भले मोठ मोठे टिप्पर, जेसीबी राष्ट्रीय महामार्गावर ठांड मांडून काम करत होती. तर रस्त्यावर जागोजागी खड्डे आणि धुळ दृष्टीस पडत होती. सदरील राष्ट्रीय माहामार्गाचे काम एच.पी.एम. कंपनीला मिळाले खरे परंतु हि कंपनी एका मालकाची नव्हती म्हणजे तीनं तीघाड आणि काम बिघाडं असेच म्हणावे लागेल कारण एच चा मालक एक पी चा मालक दुसरा तर एम चा मालक तीसरा असे तीघे एकत्र येऊन एचपीएम हि कंपनी तयार झाली होती. हितच खरी या राष्ट्रीय माहामार्गाची वाट लागली कारण या कंपनीने तुकडया-तुकड्यामध्ये कामे करायला सुरुवात केली. प्रत्येक तुकड्याचे कामे करण्यासाठी वेगळा



गुत्तेदार. असे करत करत या रस्त्यावर जेवढी गावे ,शहरे येत होती तेथे असंख्य गुत्तेदार तयार झाले. त्याच रस्त्यावर येणारे केज शहर याला कसे सुटेल .सन २०२२ मध्ये केज नगरपंचायतीच्या निवडणुका होऊन जनविकास परिवर्तन आघाडीने कॉग्रेसला सोबत घेत केज नगरपंचायतीवर सत्ता स्थापन केली आणि राष्ट्रीय महामार्गाच्या विकासात जास्तीची भर पडली जैसे वो वैसे आप म्हणणाची वेळ केजच्या जनतेवर आली. सन २०२३ मध्ये एच.पी.एम कंपनीने केज शहरामध्ये राष्ट्रीय महामार्गाच्या मधोमध पथदिवे बसवायास सुरुवात केली त्यावेळेस केज नगरपंचायतच्या सत्ताधार्यांनी याकडे दुर्लक्ष केले. पथदिवे बसविणे झाल्यावर हस्तांतरणाची प्रक्रिया पार पडली मात्र दिवे चमकलेच नाही ना कधी त्यांचा प्रकाश केजकरांनी पाहिला. त्यातच केज विकास संघर्ष समितीचे हनुमंत भोसले सर यांच्या अंदोलनाकडे शहरातील जनतेने लक्ष वेधुन घेतले. अंदोलनामुळे केज न.प. च्या सत्ताधाऱ्यांनी घाई-गडबड करत मोठ-मोठया रस्त्यालगत डि.पी .बसविल्या उद्घाटनाची वेळ ठरली दिवस ठरला १७ संष्टेबर २०२३, नेतेगन एकत्र बोलविले , श्रीफळ आणले,पत्रकारांना आमंत्रित केले,जोरजोरात श्रीफळ फोडून उद्घाटन संपन्न झाले . भाषणे झाली , थोर विचार केजकरांनी ऐकले. त्यातच अंधार पडायला सुरुवात झाली सुर्य अदृश्य झाला पोर्णीमेच्या चंद्राच्या प्रकाशात जनता गणपती बप्पाचे विसर्जनासाठी रस्त्यावर उभी होती. पथदिव्याकडे पाहत होती. आता सुरू होतील मंग सुरू होतील मात्र ४ वर्षानंतर देखील पथदिवे सुरू झालीच नाहित.

कधी होणार केजचा विकास ? होणार कि नाही ? पथदिवे सुरु होणार का ? का भयान काळोखात अपघाताने गमवावा लागणार कुणाला आणखी आपला जीव ? आदि प्रश्न केज शहरातील जनतेला पडली आहेत. मात्र सत्ताधारी याला उत्तर प्रकाशाने देतात कि अंधाराने हे पाहणे गरजेचे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904